पुढारी

# औषधी वनस्पतींच्या लागवडीतून शेतकऱ्यांना विकासाची संधी

## डॉ. एस. एस. बर्वे यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर : औषधी व सुगंधी वनस्पतीविषयक शेतकरी प्रशिक्षणाचे उद्घाटन करताना डॉ. एस. एस. बर्वे. सोबत डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतातील शेतकऱ्यांना औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड करण्याची मोठी संधी उपलब्ध असून, त्याद्वारे त्यांनी आर्थिक विकास साधण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मुलुंड (मुंबई) येथील सायंटिफिक रिसर्च सेंटरचे उपसंचालक डॉ. एस.एस. बर्वे यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा वनस्पतीशास्त्र अधिविभाग, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, आत्माचे प्रकल्प संचालक यांच्या वतीने औषधी व सुगंधी वनस्पती संवर्धन व प्रक्रिया या विषयावर एकदिवसीय जिल्हांतर्गत शेतकरी प्रशिक्षण झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक डी. डी. तांबाळे प्रमुख उपस्थित होते, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बर्वे म्हणाले, औषधी व सुगंधी वनस्पतींच्या क्षेत्रात शेतकऱ्यांना प्रचंड मोठ्या संधी आहेत. जगभरातील औषध, सुगंधी द्रव्य आणि सौंदर्यप्रसाधने निर्माण करणाऱ्या उद्योगांना त्यांची मोठ्या प्रमाणात गरज भासत असते.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपल्या संशोधनाचा लाभ व्यापक समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. प्रयोगशाळेकडून शेतीकडे या धोरणाच्या अंगिकारातून विद्यापीठाने शेतकरी वर्गाला जोडण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

यावेळी वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. अकल्पिता अरविंदेकर आदींसह वनस्पतीशास्त्र अधिविभागातील शिक्षक, शासकीय अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी या उपक्रमाचे आयोजन केले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता शिबिरात डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

# शिवाजी विद्यापीठात लोककलांचे दर्शन

## राष्ट्रीय एकात्मता शिबिरास प्रतिसाद

**कोल्हापूर, ता. २० :** राष्ट्रीय एकात्मता शिबिरात विद्यार्थ्यांनी आपापल्या प्रांतातील लोककलांचे दर्शन घडवले. या लोककलांनी समृद्ध झालेली भारतीय लोकपरंपराच रंगमंचावर अवतरली. पारंपरिक पोषाख आणि लोकगीतांनी प्रेक्षक भारावून गेले. राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या निमित्ताने देशातील ११ प्रांतातील विद्यार्थी, विद्यार्थिनी शिवाजी विद्यापीठात आले आहेत. त्यांना महाराष्ट्राचा इतिहास, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा यांची माहिती व्हावी, यासाठी विविध उपक्रम घेण्यात येतात. यात लोककला स्पर्धा झाली. डॉ. अरुण बालकृष्ण (केरळ), डॉ. अंकुश दळवी (महाराष्ट्र), डॉ. हर्षता (कर्नाटक) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. कार्तिकेयन आणि शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते. दुपारी डॉ. भारती पाटील यांनी स्त्री-पुरुष समानता या विषयावर मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्त्व विकासाचेही सत्र झाले.

Kolhapur, Kolhapur-Today
21/12/2018 Page No. 4

## सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने सोमवारी २४ डिसेंबर रोजी 'स्पर्धा परीक्षा व प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर महाराष्ट्र वनविभागाचे सचिव आयएएस अधिकारी विकास खारगे यांचे व्याख्यान होणार आहे. सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी कुलसचिव, डॉ.व्ही.डी.नांदवडेकर आहेत. यावेळी शैक्षणिक सल्लागार डॉ.डी.आर.मोरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी.एस.कांबळे यांनी केले आहे.

सकाळ

# युवा पिढीने देशाच्या विकासात योगदान द्यावे : प्रा. ठिगळे

कोल्हापूर, ता. २० : युवा पिढी ही देशाची ताकद आहे. राष्ट्र निर्मितीमध्ये युवा पिढीचे योगदान महत्त्वाचे असून त्यांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. देशाच्या विकासासाठी युवा पिढीने आपली भूमिका बजावली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. संजय ठिगळे यांनी केले. राष्ट्रीय एकात्मतेमध्ये युवकांची जबाबदारी या विषयावर ते बोलत होते. या वेळी ठिगळे म्हणाले, ''युवा पिढीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन सामाजिक दायित्व पार पाडले पाहिजे.'' दुसरया सत्रात कर्नल अनुराग सक्सेना यांनी 'भारतीय सैन्य' या विषयावर मार्गदर्शन केले. तर त्यानंतर विद्यापीठाचे एनएसएस समन्वयक डी. के. गायकवाड यांनी योग विषयावर मार्गदर्शन केले.

Kolhapur, Kolhapur-Today
21/12/2018 Page No. 6

पुढारी

## संक्षिप्त

# 'महाराष्ट्राचे राज्यशास्त्र' विषयावर आज कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र अधिविभाग आणि वृत्तपत्र व संवादशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'महाराष्ट्राचे राज्यशास्त्र' या विषयावर शुक्रवारी (दि. २१) एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेचे उद्घाटन अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील यांच्या हस्ते होईल. तर बीजभाषण कॅनडाचे डॉ. जयंत लेले यांचे होणार आहे. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. नितीन बिरमल आदी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळा अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहात सकाळी नऊ वाजल्यापासून असणार आहे.

# विद्यापीठात आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे 'महाराष्ट्राचे राज्यशास्त्र' या विषयावर कार्यशाळा होणार आहे. शुक्रवारी (ता. २१ डिसेंबर) सकाळी ९ ते ३ या वेळेत अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार सभागृहात कार्यशाळा होईल. कार्यशाळेत कॅनडा येथील क्विन्स विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयंत लेले यांचे बीज भाषण होणार आहे. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. नितीन बिरमल यांचे व्याख्यान होणार आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाची विजयी सलामी

**कसबा बावडा :** पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष गट क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने आर. के. विद्यापीठ राजकोट संघाचा तब्बल ३२७ धावांनी पराभव करून विजयी सलामी दिली. सुरत विद्यापीठ येथे ही स्पर्धा सुरू आहे. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाने ५० षटकांमध्ये तब्बल ३६२ धावांचा डोंगर उभारला. यामध्ये रणजीत कदम (९५ धावा), वैभव पाटील (५८), साहिल शिबे (५१) व ऋषिकेश चव्हाण (४५ धावा) यांनी जोरदार फलंदाजी केली. उत्तरादाखल आर. के. विद्यापीठ राजकोटचा संघ केवळ २७ धावांत कोलमडला. निखिल कदम याने पाच तर सुशील मुरली चार गडी बाद केले.

Kolhapur, Kolhapur-Today
21/12/2018 Page No. 7

# मुंबईत बनणार क्लस्टर विद्यापीठ

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय : डॉ. होमी भाभा यांचे नाव विद्यापीठाला देणार

**मुंबई : खास प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना विविध शाखांचे दर्जेदार शिक्षण एकत्रित घेण्याची संधी मिळावी, यासाठी विविध ज्ञानशाखांच्या चार कॉलेजांचे मिळून एक विद्यापीठ मुंबईत स्थापन केले जाणार आहे. डॉ. होमी जहाँगीर भाभा यांचे नाव या विद्यापीठास दिले जाणार असून, आज मंत्रिमंडळाने यास मान्यता दिली. अशा प्रकारचे हे देशातील तिसरे, तर राज्यातील पहिलेच विद्यापीठ असेल. राज्यात इतरही ठिकाणी अशी क्लस्टर महाविद्यालये स्थापन केली जाणार आहेत. रयत शिक्षण संस्थेस राज्यातील इतर शिक्षण संस्था जोडून क्लस्टर विद्यापीठ बनविण्याचा प्रस्ताव आहे.

मुंबईत स्थापन होणाऱ्या डॉ. होमी भाभा विद्यापीठात शासकीय विज्ञान संस्था, मुंबईसह (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) सिडनहॅम व एल्फिस्टन ही महाविद्यालये आणि शासकीय अध्यापक कॉलेज यांचा समावेश असेल. या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे विद्यार्थ्यांना चॉईस बेस्ट क्रेडिट सिस्टीमनुसार आपल्या आवडीचे अभ्यासक्रम निवडता येतील. म्हणजे सिडनहॅमच्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्याला कला विषयासाठी एल्फिन्स्टनमध्ये प्रवेश घेता येईल. तसेच त्याला विज्ञान संस्थेत विज्ञान शाखेचा एखादा विषय शिकण्यासाठी निवडीचे स्वातंत्र्य असेल. यामध्ये ६५ क्रेडिट असलेल्या मुख्य विषयासह उर्वरित ३५ क्रेडिट इतर विषयांमध्ये मिळवता येऊ शकेल.




- रयत शिक्षण संस्थेला क्लस्टर विद्यापीठ बनविण्याचा विचार
- विद्यार्थ्यांपुढे विविध शाखांचे शिक्षण घेण्याचा पर्याय

या विद्यापीठासाठी आवश्यक असलेल्या पदांनाही आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. अशा पद्धतीने विविध विद्याशाखांची चार महाविद्यालये एकत्र करून समूह विद्यापीठाची स्थापना केल्यास, त्याचा शैक्षणिक लाभ विद्यार्थ्यांना मिळणार असून, बदलत्या जागतिकीकरणाच्या प्रवाहात रोजगार निर्मितीचे कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम राबविणे समूह विद्यापीठांना शक्य होणार आहे.

रयत शिक्षण संस्थेसारख्या मोठ्या शैक्षणिक संस्थांना राज्यातील सर्व भागातील शिक्षण संस्थांचे मिळून क्लस्टर विद्यापीठ सुरू करण्याबाबत विचार सुरू असल्याचे सांगण्यात आले. राज्यातील विद्यापीठ कायद्यात तशी सुधारणा केली जाणार आहे.

### सरकारी लाभ कायम राहणार

*चार अनुदानित किंवा सरकारी कॉलेजांचे क्लस्टर विद्यापीठ झाल्यानंतरही तेथील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांना मिळणारे वेतन व इतर सरकारी लाभ कायम राहणार असल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली. भौगोलिक क्षेत्राचा विचार करून चार कॉलेज मिळून एका क्लस्टर विद्यापीठाची स्थापना करता येते.*

**खासगी विद्यापीठांच्या शुल्कवाढीवर अंकुश**

खासगी विद्यापीठांना कौशल्य विकास, क्रीडा, औषध, वस्त्रोद्योग, कृषी, पशुसंवर्धन, मत्स्य संवर्धन विकास आदी अभ्यासक्रमांसाठी मान्यता देण्याचाही महत्त्वाचा निर्णय आज मंत्रिमंडळाने सरकारने घेतला. बोंगीरवार समितीच्या शिफारशींनुसार खासगी विद्यापीठांना आपल्या विद्यापीठांमध्ये विविध विषयांचे अभ्यासक्रम सुरू करता येणार आहेत.

**विद्यापीठांना पूर्णवेळ अधिष्ठाता मिळणार**

राज्यातील अकृषी विद्यापीठांसाठी विद्याशाखा अधिष्ठाता या पदांना मान्यता देण्यात आली असून, नवीन विद्यापीठ कायद्यानुसार आता चारच विद्याशाखा करण्यात आल्या आहेत.

# मुंबईत होणार होमी भाभा विद्यापीठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यातील पहिल्या समूह विद्यापीठाला गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुंबईतील चार महाविद्यालयांना एकत्रित करून डॉ. होमी भाभा विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. या विद्यापीठात चॉइस बेस्ड क्रेडिट सिस्टीम लागू करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शाखांमधील अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे.

डॉ. होमी भाभा विद्यापीठात मुंबईतील शासकीय विज्ञान संस्था (इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स) या मुख्य विद्यालयासह सिडनहॅम कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज व शासकीय अध्यापक महाविद्यालय (बीएड कॉलेज) या चार महाविद्यालयांचा समावेश असणार आहे.